महाराष्ट्र शासन
वनविभाग
उपसंचालक,(बफर) ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांचे कार्यालय.
दूरध्वनी क्र.07172-252218 फक्स क्र. 07172-276420 रामबाग वनवसाहत, मुल रोड, चंद्रपूर
Email-dycfcha@gmail.com

क्रमांक :- कक्ष-9/शिली-1/2021-22/ दिनांक :- 14/07/2021

# प्रेसनोट

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील बफर झोन मधिल निर्सग पर्यटन कोविडच्या प्रादुर्भावामुळे दिनांक 14/04/2021 पासून बंद ठेवण्यांत आले होते. तरी शासनाने कोविड संदर्भात निर्बधा मध्ये काही प्रमाणात शिथिलता दिल्याने व प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा., नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष 23(4)/प्रक्र.15(2021-22)/515, दिनांक 24/06/021 अन्वये अटी व शर्तीनुसार पर्यटन सुरू करण्यांचे परवानगी देण्यांत आलेली होती. त्यानुषंगाने दिनांक 28/06/2021 पासून बफर झोन ताडोबा-अधारी व्याघ्र प्रकल्प मधिल **पर्यटन ऑफलाईन पध्दतीने सुरू** करण्यांत आले होते. परंतु पर्यटन गेटवर पर्यटकांची फार मोठया प्रमाणात गर्दी होत असल्याने कोविड अंतर्गत दिलेल्या सुचनेचे पालन होत नव्हते. **यावर खबरदारीचे उपाय म्हणून दिनांक 16/07/2021 रोजीचे व त्यापुढील सफारीचे ऑनलाईन बुकिंग ही दिनांक 15/07/2021 रोजी सकाळी 07.00 वाजता पासून** mytadoba.org या संकेतस्थळावरून सुरू करण्यांत येत आहे.

1) बफर झोन मधिल पर्यटन दिनांक 16/07/2021 ते 30/09/2021 पर्यत मानसून सफारी ऑनलाईन पध्दतीने सुरू राहील.

2) सफारी करीता वेळ सकाळी 6.00 ते 10.00 व दुपारी 02.30 ते 06.30 पर्यंत राहील.

3) सर्व सफारीचे आरक्षण ऑनलाईन पध्दतीने केले जाईल. ऑनलाईन चार्जेस खालिल प्रमाणे आहे.

   एंट्री फि = रु. 1000/-, जिप्सी फि = रु. 2500/- व मार्गदर्शक फि = रु. 500 असे एकूण रु. 4000/- राहील.



Scanned with CamScanner

4) बफर झोन मधिल 14 पर्यटन गेट पैकी 13 पर्यटकांनकरीता खुले राहील.

| अ.क्र. | पर्यटन गेट चे नांव | सकाळ फेरी जिप्सी कोटा | दुपारी फेरी जिप्सी कोटा |
|---|---|---|---|
| 1 | आगरझरी बफर | 6 | 6 |
| 2 | देवाडा-अडेगांव बफर | 12 | 12 |
| 3 | जुनोना बफर | 6 | 6 |
| 4 | कोलारा बफर | 6 | 6 |
| 5 | मदनापुर बफर | 6 | 6 |
| 6 | अलिझंझा बफर | 6 | 6 |
| 7 | नवेगांव-रामदेगी बफर | 6 | 6 |
| 8 | निमढेला बफर | 6 | 6 |
| 9 | पांगडी बफर | 4 | 4 |
| 10 | मामला बफर | 6 | 6 |
| 11 | झरी पेठ बफर | 4 | 4 |
| 12 | केसलाघाट बफर | 4 | 4 |
| 13 | सिरकडा बफर | 6 | 6 |

5) एका कुटुंबाचे 06 व्यक्ति असल्यास एका जिप्सी मध्ये प्रवेश राहील. अन्यथा वेगळया कुटुबांचे असल्यास एका जिप्सी मध्ये फक्त चारच व्यक्तिनां प्रवेश राहील.

6) सर्व प्रवेश द्वारावर पर्यटकांनी सोशल डिसटन्सिंग ठेवणे, स्वत-चे सॅनिटाईजर आणने व मास्क लावणे पर्यटनाच्या वेळेस आवश्यक राहील.

7) प्रवेश द्वारातून प्रवेश देण्यापूर्वी सर्व पर्यटक, मार्गदर्शक व जिप्सी चालक यांचे शरीराचे तापमान हे थर्मल स्कॅनर ने तपासणे आवश्यक राहील.

8) प्रवेश करण्यापूर्वी जिप्सी चालक व मार्गदर्शक येण्यापूर्वी स्वत:चे मास्क लावणे सॅनिटाईज करून बसणे व गाडी सॅनिटाईज करून आणने आवश्यक राहील.

9) पर्यटना दरम्यान पर्यटकास मोबाईल फोन नेण्यास बंदी राहील. मानसून सफारी दरम्यान पर्यटन रोडचे स्थिती लक्षात घेता फक्त जिप्सी चालक व मार्गदर्शकाना मोबाईल फोन वापरण्याचे परवानगी राहील.

10) मानसूनच्या वेळेस Night safari, Boating, Kayaking, Bird Machan, Night Machan stay, Log-hut stay उपक्रम (Other Activities) बंद राहील. तथापी walking trail (सितारामपेठ व आगरझरी) व Cycling (मोहर्ली), Camping site (आगरझरी व मदनापूर) सुरू राहील.

(जी. गुरुप्रसाद)
उपसंचालक, (बफर)
ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर.



Scanned with CamScanner